# श्री स्वामी समर्थ अष्टक

असें पातकी दीन मीं स्वामी राया ।
पदी पातलो सिद्ध व्हा उद्धराया ॥
नसे अन्य त्राता जगी या दीनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 1 ॥

मला माय न बाप न आप्त बंधू ।
सखा सोयरा सर्व तू दीन बंधू ॥
तुझा मात्र आधार या लेकराला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 2 ॥

नसे शास्त्र विद्या कलादीक काही ।
नसे ज्ञान, वैराग्य ते सर्वथा ही ॥
तुझे लेकरू ही अहंता मनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 3 ॥

प्रपंची पुरा बद्ध झालो दयाळा ।
तुझा दास मी ही स्मृती ना मनाला ॥
क्षमेची असे याचना त्वत्पदाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 4 ॥

मला काम क्रोधाधिकी जागविले ।
म्हणोनी समर्था तुला जागविले ॥
नका दूर लोटू तुझ्या सेवकाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 5 ॥

नको अंत पाहू त्वरे धाव घेई ।
तुझ्यावीण नाही दुजी श्रेष्ठ आई ॥
अनाथासि आधार तुझा दयाळा ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 6 ॥

कधी गोड वाणी न येई मुखाला ।
कधी द्रव्य ना अर्पिले याचकाला ॥
कधी मुर्ती तुझी न ये लोचनाला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 7 ॥

मला एवढी घाल भीक्षा समर्था ।
मुखे नित्य गावी तुझी गुण गाथा ॥
घडो पाद सेवा तुझ्या किंकराला ।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ॥ 8 ॥

॥ श्री स्वामी समर्थार्पणमस्तु ॥